**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध देशांबरोबरच्या व्यापार करारांमुळे तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी मिळणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत कोपरगावची संजीवनी सैनिकी शाळा देशात पहिल्या स्थानी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या 'मन की बात'द्वारे देशवासियांना संबोधित करणार

**आणि**

- टी - ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत बांग्लादेश ऐवजी स्कॉटलंडचा समावेश करण्याचा आयसीसीचा निर्णय

**<><><><><>**

तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून यासाठी विविध देशांशी व्यापार करार केले जात आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित अठराव्या रोजगार मेळाव्याला ते दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते. रोजगार मेळाव्याद्वारे आतापर्यंत लाखो युवांना विविध सरकारी विभागांमध्ये नियुक्ती मिळाली असून हे नियुक्तीपत्र तरुणांना विकसित भारताकडे घेऊन जाणारं संकल्पपत्र आहे, असं त्यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट मोदी***

या रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या ६१ हजार जणांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. यात आठ हजार महिलांचा समावेश आहे. गृह विभाग, वित्त विभाग, महसूल विभाग, आरोग्य

विभाग, उच्च शिक्षण विभाग, संरक्षण विभाग आदी विभागात या नियुक्त्या होत आहेत.

गेल्या दहा वर्षांत भारताचं सकल देशांतर्गत उत्पादन दुपटीने वाढलं, जगभरातले शंभरपेक्षा अधिक देश भारतात थेट परकीय गुंतवणूक करत आहेत, त्यामुळे अगणित रोजगार निर्माण झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. देशात जवळपास दोन लाख नोंदणीकृत स्टार्टअप आहेत, यात २१ लाखापेक्षा जास्त युवा काम करत आहेत, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत नागरिकांची क्रयशक्ती वाढल्याचंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर येत्या सोमवारी होणाऱ्या संचलनातल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगीत तालीम आज झाली. सुमारे अडीच हजार कलाकारांनी त्यात भाग घेतला. वंदे मातरम् गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव हा संचलनाचा प्रमुख विषय आहे. एमएम कीरवाणी यांचं संगीत सुभाष सेहगल यांचं गीत आणि अभिनेता अनुपम खेर यांचं निवेदन या सांस्कृतिक कार्यक्रमाला लाभलं आहे. ज्येष्ठ नृत्यांगना संध्या पुरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष नायर यांनी नृत्य बसवली आहेत.

**<><><><><>**

जग अनिश्चिततेच्या टप्प्यातून जात असल्यानं देशातल्या युवकांनी कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी शारीरिक, मानसिक आणि भावनिकरित्या सज्ज राहावं असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित राष्ट्रीय छात्र सेनेच्या शिबिरात बोलत होते. देशातल्या युवकांनी शूर आणि समर्पित एन. सी. सी. छात्रांकडून प्रेरणा घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं. ऑपरेशन सिंदूर दरम्यान

भारताच्या सशस्त्र दलांनी अत्यंत संयम आणि जिद्दीनं पाकिस्तानातले दहशतवादी तळ नष्ट केल्याचं सांगत सिंह यांनी सशस्त्र दलांची प्रशंसा केली.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिन सोहळ्या निमित्त आयोजित राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत कोपरगावच्या संजीवनी सैनिकी शाळेने देशात पहिला क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर नाव कोरले. मुलींच्या ब्रास बँड गटात मुंबईच्या डॉन बॉस्को हायस्कूलने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त करत राज्याचा गौरव वाढवला. या स्पर्धेत संपूर्ण देशातील ७६३शाळांमधील सुमारे १८ हजार १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता  आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३० वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, AIR न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसेच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होणार आहे.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, उद्या संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून रोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><>**

युरोपीय संघाच्या अध्यक्ष उर्सुला व्हॉन डेअर लाईएन यांचं आज दुपारी भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत आगमन झालं. येत्या सोमवारी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात युरोपीय मंडळाचे अध्यक्ष अंतोनियो लुईश सांतूश दा कोस्ता यांच्यासोबत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून सहभागी होतील. लाईएन यांच्या या दौऱ्यात भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यातल्या धोरणात्मक भागीदारीच्या पुढच्या टप्प्याबद्दल चर्चा होईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. त्यानंतर २७ जानेवारी रोजी १६व्या भारत-युरोपीय संघ परिषदेचं अध्यक्षपदही हे दोन्ही नेते भूषवणार आहेत.

**<><><><>**

अचूक मतदार याद्या या लोकशाहीचा पाया आहेत, असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राष्ट्रीय मतदार दिनाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. प्रत्येक पात्र मतदाराची नावं मतदार यादीत समाविष्ट करणं आणि अपात्र नावं वगळण्याच्या उद्देशानं मतदार याद्यांचं विशेष पुनिरीक्षण सुरु करण्यात आलं, असंही ते म्हणाले. बिहारमध्ये ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून सध्या १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात ती सुरळीत सुरु आहे, असं ते म्हणाले. इतर राज्यांमध्येही लवकरच ही प्रक्रीया सुरू होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. डिजिटल युगाची गरज ओळखून निवडणूक आयोगानं ई सी आय नेट या ॲपद्वारे सर्व मतदार सेवा एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून दिल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. तरुण मतदारांनी आवर्जून मतदान करावं तसंच चुकीची आणि दिशाभूल करणाऱ्या माहिती विरोधी लढ्याचं नेतृत्व करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी २७ जानेवारीला सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसद भवनात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत ही बैठक होईल.

२८ जानेवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होणार असून १ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगात इराणला ठाम पाठिंबा दिल्याबद्दल इराणचे भारतातले राजदूत मोहम्मद फथाली यांनी भारत सरकारचे आभार मानले आहेत. इराणमधलं आंदोलन हे अन्याय्य आणि राजकीय हेतूनं प्रेरित असल्याचं फथाली यांनी म्हटलं आहे. भारताचा पाठिंबा हे न्याय, बहुपक्षीयता आणि राष्ट्रीय सार्वभौमत्त्वाप्रति असलेल्या वचनबद्धतेचं प्रतीक असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

इंडोनेशियाच्या पश्चिम जावा प्रान्तात मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाल्यानं ७ जणांचा मृत्यू तर सुमारे ८२ लोक बेपत्ता झाले आहेत. या भागात आठवडाभर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आधीच वर्तवण्यात आली आहे.

<><><><><>

टीट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी बांगलादेश ऐवजी आता स्कॉटलंड खेळणार असल्याचं अधिकृत घोषणा आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं केली आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी काल दुबईतून या माहितीची ई मेल बांगला देश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल यांना पाठवलं आहे. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुरक्षेच्या कारणास्तव भारताच्या भूमीवर खेळायला बांगलादेशच्या खेळाडूंनी नकार दिल्यानंतर आयसीसीने हा निर्णय घेतला. दरम्यान आपल्याला याबाबत अद्याप काहीही कळवलेलं नाही, असं स्कॉटलंड क्रिकेट संघटनेनं सांगितलं.

<><><><><>

१९ वर्षांखालच्या टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतानं न्यूझीलंडवर ७ गडी राखून मात केली. झिंबाब्वेच्या बुलावायो इथं झालेल्या या सामन्याला ओल्या खेळपट्टीमुळे विलंब झाल्यामुळे सामना ३७ षटकांचा खेळवण्यात आला. भारतानं नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला फलंदाजीचं निमंत्रण दिलं. न्यूझीलंडचा संपूर्ण संघ ३६ षटकं आणि २ चेंडूंतच १३५ धावा काढून तंबूत परतला. आर. एस. अंबरीश यानं ४, तर हेनिल पटेल यानं ३ गडी बाद केले. भारतानं १३६ धावांचं लक्ष्य १३ षटकं आणि ३ चेंडूंतच पूर्ण केलं. आयुष म्हात्रे यानं २७ चेंडूंमध्ये ५३ धावा फटकावल्या.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा स्विडिश जोडीदार आंद्रे गोरान्सन यांनी चौथ्या फेरीत प्रवेश केला. तिसऱ्या फेरीच्या अटीतटीच्या सामन्यात त्यांनी प्रतिस्पर्धी जोडीवर ४-६, ७-६, ६-३ असा विजय मिळवला. श्रीराम बालाजी आणि त्याच्या जोडीदाराला मात्र पराभव पत्करावा लागला.

**//<><><><><>//**